**मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**
सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर
"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष-2015"
**"जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट दया -https://wrd.maharashtra.gov.in"**
फॅक्स –0712- 2541608 फोन नं.- 0712-2561485
E.mail :- cegpidnagpur@gmail.com


**आदेश क्रमांक/27/आ-4/मुअगोप्र/सरळसेवा/क.अ./2017** **दिनांक 20/2/2017**

## -:कार्यालयीन आदेश:-

**विषय :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नियुक्तीबाबत.**

**संदर्भ :-** शासन,जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे पत्र क्र. नियुक्ती 1117/(प्र.क्र. 01/2017)/आ(तांत्रिक) मंत्रालय, मुंबई, दिनांक 25 जानेवारी 2017

---000---

उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्राचे आधारे सदर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नियुक्तीसाठी सरळसेवा भरतीव्दारे घेण्यात आलेल्या एकत्रित स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालावर आधारीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर नियुक्तीसाठी संदर्भिय पत्रान्वये प्राप्त 1202 उमेदवारापैकी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील सद्य:स्थितीत नियुक्तीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची जलसंपदा विभागात ते रुजू होतील त्या दिनांकापासुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) म्हणुन रुपये **9300-34800+ ग्रेड पे रु.4300** या वेतनश्रेणीत त्यांच्या नावासमोर स्तंभ-7 मध्ये नमुद केलेल्या विभागात/ कार्यालयात नियुक्ती करण्यात येत आहे.

**2.** परिशिष्ट-अ मधील उमेदवारांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली क्र. एसआरव्ही.2015/प्र.क्र.156/कार्या.12, दिनांक 28 एप्रिल 2015 व दिनांक 16 जुलै 2015 मधील तरतूदी लागु राहतील. वाटप केलेला महसूल विभाग बदलीकरीता कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही. सदर उमेदवारांची महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-2 (स्थापत्य) (अराजपत्रित), जलसंपदा विभागातील पदस्थापना ही अंतिम राहील. **नियुक्त झालेल्या उमेदवारांनी त्या महसुली विभागात किमान नऊ वर्षे इतका सेवा कालावधी पुर्ण करणे बंधनकारक राहील. याबाबतचे शपथपत्र नियुक्त होणा-या उमेदवारांनी नियुक्तीच्यावेळी देणे आवश्यक राहील.**

**उमेदवारांनी नियुक्तीनंतर शासन निर्णय क्रमांक : टीआरएन-0514/प्र.क्र. 7/14/18-ब, दिनांक 24/4/2015 नुसार किमान 5 वर्षे शासन सेवा करणे बंधनकारक आहे, तसेच रूजु होतांना रू. 3 लक्ष रकमेचे विहित नमुन्यातील बंधपत्र ही सादर करणे आवश्यक राहील.**

**3.** सामान्य प्रशासन विभागए शासन निर्णय क्रमांक : चापअ-1008/प्र.क्र. 2014/08/16-अ, दिनांक जानेवारी 2009 मधील तरतूदीनुसार चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त होण्याच्या अधीन राहून सदर उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत आहे . तथापि, नियुक्तीच्या तारखेपासून 6 महिन्यांच्या आत संबंधित पोलिस अधीक्षकांचा चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच चारित्र्य पडताळणी अहवाल असमाधानकारक असल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देवून समाप्त करण्यात येईल.

**4.** महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 मधील नियम 11 (1) मधील तरतूदीनुसार नियुक्तीच्या तारखेपासून 6 महिन्याची सेवा होण्यापूर्वी उमेदवाराने



PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

आरोग्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सदर उमेदवार वैद्यकीय तपासणीमध्ये पात्र असण्याच्या अटीच्या अधीन राहून सदर नियुक्ती देण्यात येत आहे. उमेदवार वैद्यकीय तपासणीमध्ये अपात्र आढळल्यास नियमातील तरतूदीनुसार त्यांची सेवा कुठलीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

**5**. सदर उमेदवारांची ज्येष्ठता शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही 1076/12, दिनांक 21/06/1982 अन्वये विनियमित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, 1982 मधील तरतुदीनुसार गुणवत्ता क्रमांकानुसार निश्चित करण्यात येईल.

**6**. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) मधील उमेदवारांची नियुक्ती ही खालील विहित शर्तीच्या अधीन असेल.

**अ)** परिशिष्ट-अ मधील उमेदवारांनी खाली नमुद अटी व शर्तीच्या अधीन महाराष्ट्र शासनाच्या सेवेत सविस्तर नियुक्ती मिळण्यासाठी अधीक्षक अभियंता यांच्याकडे हे आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष संपर्क साधावा व सेवेत रुजू व्हावे.

**ब)** उमेदवारांने नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी रुजू झाले पाहीजे. अन्यथा एक महिन्यानंतर सदर नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील. कार्यालय प्रमुखांनी एक महिन्यानंतर रुजू होणा-या अभियंत्यास रुजू करुन घेऊ नये.

**क)** परिशिष्ट-अ मधील मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांनी जातीचा दावा संबंधित विभागीय जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र शासनास व संबंधित नियुक्ती प्राधिका-यास सादर करणे आवश्यक राहील. परिशिष्ट-अ मधील ज्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र शासनास सादर केलेली नाही. अशा उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16 ब दिनांक 12/12/2011 मधील तरतुदीच्या अनुषंगाने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. संबंधित उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 6 महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र शासनास सादर करावे. अन्यथा कुठलीही पूर्वसुचना न देता नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील.

**7**. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी महिला समांतर आरक्षण या कोटयातून महिला आरक्षणाचा लाभ देण्यासाठी त्यांनी सादर केलेली नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रे महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांच्या कडून तपासणीअंती वैध ठरण्याच्या अटीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र चुकीचे/खोटे आढळल्यास कुठलीही पूर्वसुचना न देता सदर नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

**8**. आवश्यकता भासल्यास परिशिष्ट-अ मधील उमेदवारांना भारताच्या संरक्षण सेवेतील पदावर किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या कुठल्याही पदावर देशात किंवा परदेशात प्रशिक्षणाच्या कालावधी धरुन चार वर्षापेक्षा कमी नसणा-या कालावधीसाठी भारत सरकार ठरविल त्या शर्तीवर सेवा करावी लागेल. परंतु

(अ) त्यांच्या नियुक्तीनंतर 10 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यांना अशी सेवा करावी लागणार नाही .

किंवा

(ब) सर्वसाधारणपणे त्यांच्या वयाची 40 वर्ष पुर्ण झाल्यानंतर त्यांना अशी सेवा करावी लागणार नाही.

Dr. V.V. PATIL COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil College of Engineering
Ahmednagar

**9**. परिशिष्ट-अ मधील उमेदवारांनी हिन्दी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा तिला भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळाली नसेल तर यासंबधी असलेल्या नियमानुसार भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**10**. परिशिष्ट-अ मधील उमेदवारांनी शासनाने विहीत केलेली संगणक परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल तर शासनाने विहित केलेली संगणक परीक्षा या संबंधी असलेल्या नियमानुसार उत्तीर्ण करावी लागेल.

11. परिशिष्ट-अ मधील उमेदवारांची सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असल्यास, त्यांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही 1092/1033/प्र.क्र.33/92/8 दिनांक 2/12/97 मधील तरतुदीनुसार शासनाला किमान 1(एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक राहील. मात्र गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखादया उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरीलप्रमाणे नोटीस देण्याचे बंधन शासनावर राहणार नाही.

12. परिशिष्ट-अ मधील उमेदवार ज्या दिवशी रुजू होतील त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांचे गोपनीय अहवाल लिहण्यात यावेत व बदली झाल्यास ते संबंधित अधिका-याकडे पाठवुन विभाग प्रमुखांनी याबाबत संबंधित सक्षम प्राधिका-यास कळवावे.

13. परिशिष्ट-अ मधील उमेदवार जर सध्या जलसंपदा विभाग/ सार्वजनिक बाधकाम विभाग अथवा शासनाच्या इतर विभागात काम करीत असतील तर संबंधित नियंत्रक अधिका-यांनी त्यांनी नेमणुकीचे ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतुन कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे लेखी पत्र संबंधित अधीक्षक अभियंता किंवा कार्यालय प्रमुख यांना सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेता येणार नाही.

**14**. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो 1005/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 अन्वये उमेदवारांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल, भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही. मात्र उपरोक्त उमेदवारांपैकी जे शासकीय कर्मचारी 1 नोव्हेंबर 2005 पुर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असतील त्यांना शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अंनियो 1006/87/सेवा-4दिनांक 12 जानेवारी 2007 मध्ये नमुद केलेल्या अटींच्या पुर्ततेच्या अधीन राहुन महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहील.

**15.** परिशिष्ट-अ मधील उमेदवारांनी सेवा प्रवेश नियमानुसार व्यावसायिक परिक्षा विहीत कालावधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

16. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग तसेच अमागास (महिला) या वर्गवारीवर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवाराची सक्षम प्राधिका-यांनी प्रमाणित केलेली उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे विहित नमुन्यातील (NCL) प्रमाणपत्र सादर करण्याचे अटीचे अधीन राहुन तात्पूरती नियुक्ती देण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र तपासणीअंती खोटे आढळल्यास कुठलीही पूर्वसुचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**16.** अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू पदावर नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची क्रिडाविषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राक्रीधो-2002/प्र.क्र. 68/क्रीसुसे-2, दिनांक 30 एप्रिल 2005 नुसार नियुक्तीपूर्वी संचालक क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पूणे यांच्याकडून प्रमाणीत करून सादर करावी.

**17.** सरळसेवेद्वारे नियुक्तीचे जागेवर रूजु होतांना सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-2002/प्र.क्र. 17/2000/12, दिनांक 1.7.2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. प्रमाणपत्र खोटे आढळल्यास कुठलीही पूर्वसुचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**18.** परिशिष्ट-अ मधील उमेदवारांना भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

**19.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 मधील नियम 19 तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक 15.7.1986 व 24.11.1988 चे नियमान्वये शासकीय सेवकांने आपल्या प्रथम नियुक्तीच्या वेळी तसेच शासन विहीत करील त्या-त्या वेळी आपली मत्ता व दायीत्वे विवरणपत्रे विहित प्राधिकरणाकडे न चुकता सादर करावी.

**20.** सदर उमेदवारांचे बाबतीत शासनाच्या प्रशिक्षणविषयक प्रचलित धोरणांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

**21.** उपरोक्त निर्देशाव्यतिरिक्त शासनाचे नियुक्ती संदर्भातील प्रचलित आदेश विचारात घेवून नियुक्ती देण्यात येत आहे. शासनाचे सदर प्रचलित आदेश उमेदवारांना बंधनकारक राहतील.

**22.** विशिष्ट ठिकाणी पदस्थापना/ बदली/ नियुक्ती मिळविण्यासाठी खासदार/ आमदार/ लोकप्रतिनिधी/ खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचे मार्फत दडपण/ दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारांविरुध्द महाराष्ट नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, 1979 मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

**23.** संबंधित अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना असे कळविण्यात येते की, परिशिष्ट-अ मधील उमेदवारांच्या नियुक्तीचे कार्यालय/ पदस्थापना दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापनेची कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसांत करावी व त्याबाबतचा अहवाल प्रादेशिक कार्यालयास/ शासनास तात्काळ पाठविण्यात यावा. शासन आदेशात नमुद केल्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने विभागीय संवर्ग वाटपाव्दारे मंजूर केलेल्या महसुली विभागात कोणताही बदल करण्यात येवू नये अन्यथा संबंधितांविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल. तसेच, सदर आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापुर्वी त्यांची सर्व संबंधित मुळ कागदपत्रे तपासुन रुजू करुन घ्यावे.

**24.** संबंधित कार्यालयाने उमेदवारांना रूजु करून घेतेवेळी आवश्यक त्या सर्व अटींची व कागदपत्रांची पूर्तता करून घेणे आवश्यक आहे. केवळ प्रादेशिक कार्यालयाचे आदेश आहेत म्हणुन सर्व जबाबदारी प्रादेशिक कार्यालयावर ढकलता येणार नाही. याची सर्व संबंधित कार्यालयाने नोंद घ्यावी व विहीत कालावधीत उपरोक्त अटींची पूर्तता करण्याकरीता आवश्यक तेथे उमेदवारांशी/कर्मचा-याशी पत्रव्यवहार करून संबंधीत उमेदवार/कर्मचा-याकडून सविस्तर नियुक्ती आदेशापूर्वीच अटींची पूर्तता करून घेणे ही संबंधित कार्यालयाची जबाबदारी असेल. त्या अनुषंगाने अनुपालन अहवाल प्रादेशिक कार्यालयास सादर करावा ही विनंती.

**25.** नियुक्त झालेल्या उमेदवाराने सेवेच्या कालावधीत कधीही चुकीचे/खोटे प्रमाणपत्र/दस्तऐवजांचे आधारे शासकीय सेवा प्राप्त केल्याचे आढळल्यास सदर उमेदवारास कोणतेही कारण/पूर्वसुचना न देता शासकीय सेवेतून कमी करून शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**26.** उपरोक्त आदेशातील सर्व अटींचे मी काळजीपूर्वक वाचन केले आहे, आदेशातील सर्व अटी मला मान्य आहेत अशा प्रकारचे बंधपत्र संबंधित उमेदवारास कामावर रूजु होण्यापूर्वी 100 रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावे लागेल व त्यानंतरच त्याला कामावर रूजु होता येईल.

मुळ प्रत मा. मुख्य अभियंता यांना मान्य.

(स.ना.लढ्ढा)
सहायक मुख्य अभियंता,
गोसीखुर्द प्रकल्प,
जलसंपदा विभाग नागपूर

**जावक क्रमांक/ /आ-4/मुअगोप्र/सरळसेवा/ दिनांक /2/2017**
**क.अ./2017**

**प्रतीलिपीः-**

COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

1) **मा.सचिव (लाक्षेवि),** जलसंपदा विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय,मुंबई-32 यांना माहितीस्तव सस्नेह.
(लक्षवेधः- श्री ग.वि.मठपती, शासनाचे कार्यासन अधिकारी )

2) **कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर**

3) **अधीक्षक अभियंता,** नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर./गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, अंबाडी (भंडारा)/ गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर

**2/-** सदर आदेशातील अ.क्र. 19 (गोसीखुर्द उजवा कालवा उपविभाग क्र. 1 ब्रम्हपूरी आणि अ.क्र. 22 गोसीखुर्द धरण उपविभाग क्र. 1 गोसीखुर्द) या कार्यालयांची मुळ आस्थापना गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर यांचेकडील असून सदर उपविभाग तात्पुरते कामाकरीता गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, अंबाडी यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

4) **श्री/ श्रीमती ----------------------------------------------------यांना माहितीस्तव.**

5) **आ-3, 5, 6, प्रादेशिक कार्यालय यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव**

6) **कार्यालयीन आदेश धारीका.**

Dr. V.V. Patil College of Engineering Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

प्रादेशिक कार्यालयाचे आदेश क्रमांक/ /आ-4/मुअगोप्र/सरळसेवा/ क.अ./2017/दिनांक /2/2017 चे सहपत्र

परिशिष्ट-अ

| अ. क्र. | गुणवत्ता क्र. | नाव (श्री/श्रीमती) | जात प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | सा.प्र.वि. ने वाटप केलेला संवर्ग | नियुक्तीसाठी पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | 5 | कानगुडे किरण दिपक | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, नागपूर/गो.पुर्नवसन उपविभाग क्र. 3, भिवापूर (रिक्तपदी) |
| 2 | 13 | जाधव आकाश श्रीधरराव | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.उ.का विभाग, ब्रम्हपूरी/विभागीय कार्यालयात (रिक्तपदी) |
| 3 | 21 | टोण्णे विराज राजेंद्र | इ.मा.व | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गोसीखुर्द उजवा कालवा विभाग क्र. 1 वाही (पवनी) (विभागीय कार्यालयात) (रिक्तपदी) |
| 4 | 29 | पोतदार राहुल चंद्रशेखर | इ.मा.व | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/आसोलामेंढा प्र.नुतनीकरण विभाग, नागभिड/गोसीखुर्द उ.का.उपविभाग क्र. 11, ब्रम्हपुरी (रिक्तपदी) |
| 5 | 37 | धांडोरे रावसाहेब दादा | अ.जा. | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/ आसोलामेंढा प्र.नुतनीकरण विभाग, नागभिड/गोसीखुर्द उ.का.उपविभाग क्र. 11, ब्रम्हपुरी (रिक्तपदी) |
| 6 | 53 | भट पंकज नंदूलाल | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो. पुर्नवसन विभाग, नागपूर/गो.पुर्नवसन उपविभाग क्र. 4, कुही (रिक्तपदी) |
| 7 | 61 | जगताप शेखर संभाजी | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो. पुर्नवसन विभाग, नागपूर/गो.पुर्नवसन उपविभाग क्र. 4, कुही (रिक्तपदी) |
| 8 | 70 | देसाई मनोज जयसिंग | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/ आसोलामेंढा प्र.नुतनीकरण विभाग, नागभिड/गोसीखुर्द उ.का.उपविभाग क्र. 13, नागभिड (रिक्तपदी) |
| 9 | 86 | क्षीरसागर कुंदन पुंडलिक | इ.मा.व | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/ आसोलामेंढा प्र.नुतनीकरण विभाग, नागभिड/गोसीखुर्द उ.का.उपविभाग क्र. 14, नागभिड (रिक्तपदी) |
| 10 | 94 | पेडणेकर केशव प्रकाश | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/ आसोलामेंढा प्र.नुतनीकरण विभाग, नागभिड/गोसीखुर्द उ.का.उपविभाग क्र. 14, नागभिड (रिक्तपदी) |
| 11 | 110 | सय्यद जावेद सादीक | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/ आसोलामेंढा प्र.नुतनीकरण विभाग, नागभिड/आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण उपविभाग क्र. 3 सावली (रिक्तपदी) |
| 12 | 118 | साबळे भास्कर चंद्रकांत | इ.मा.व | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/ आसोलामेंढा प्र.नुतनीकरण विभाग, नागभिड/आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण उपविभाग क्र. 1 सावली (रिक्तपदी) |

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | 126 | पिसाळ वैजिनाथ मनोहर | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.उजवा कालवा विभाग क्र. 1 वाही /गो.उ.का.उपविभाग क्र. 3 वाही रिक्तपदी) |
| 14 | 134 | शेख शाकीर मन्सूर | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.उजवा कालवा विभाग क्र. 1 वाही /गो.उ.का.उपविभाग क्र. 3 वाही रिक्तपदी) |
| 15 | 142 | गवळी प्रणव अनिल | भ.ज.ब. | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.उजवा कालवा विभाग क्र. 1 वाही /गो.उ.का.उपविभाग क्र. 4 वाही रिक्तपदी) |
| 16 | 158 | महाले गिरीष योगेश | इ.मा.व | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/ गो.उजवा कालवा विभाग ब्रम्हपूरी /गो.उ.का.उपविभाग क्र. 6 ब्रम्हपुरी रिक्तपदी) |
| 17 | 166 | पवार शैलेशकुमार सुखदेव | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.उजवा कालवा विभाग क्र. 1 वाही /गो.उ.का.उपविभाग क्र. 9 ब्रम्हपूरी रिक्तपदी) |
| 18 | 182 | काळे जयदिप मोहन | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.उजवा कालवा विभाग क्र. 1 वाही /गो.उ.का. उपविभाग क्र. 9 ब्रम्हपुरी (रिक्तपदी) |
| 19 | 198 | राखुंडे तन्मय प्रदीप | इ.मा.व | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.उजवा कालवा विभाग क्र. 1 वाही/विभागीय कार्यालयात (रिक्तपदी) |
| 20 | 206 | जाधव संजय डोमासिंग | वि.जा. | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/विभागीय कार्यालयात (रिक्तपदी) |
| 21 | 230 | भलकार राहुल नारायण | भ.ज.क. | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 5 पलाडी (रिक्तपदी) |
| 22 | 238 | पाटील शुभांगी सर्जेराव | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, नागपूर/विभागीय कार्यालयात (रिक्तपदी) |
| 23 | 246 | ठाणगे अमोल रावसाहेब | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 5 पलाडी (रिक्तपदी |
| 24 | 254 | जाधव कुनाल जयवंत | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 6 अंबाडी (रिक्तपदी) |
| 25 | 262 | गायकवाड रावसाब दिगंबर | अ.जा. | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 7 चकारा (रिक्तपदी) |
| 26 | 270 | शेटे सुहास शिवाजी | इ.मा.व | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 7 चकारा (रिक्तपदी) |
| 27 | 278 | गोधडे अमोल महादेव | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 8 चकारा (रिक्तपदी) |
| 28 | 286 | टेकाळे रामेश्वर सुधाकर | खुला | खुला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, अंबाडी/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 8 चकारा (रिक्तपदी) |

DR. V.V. PATIL COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 29 | 294 | तिडके राहूल दत्तात्रय | भ.ज.ड. | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.धरण विभाग, वाही/विभागीय कार्यालयात (रिक्तपदी) |
| 30 | 302 | घोडके अनिल आत्माराम | भ.ज.ब. | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.धरण विभाग, वाही/गोसीखुर्द धरण उपविभाग क्र. 4 वाही (रिक्तपदी) |
| 31 | 310 | आबिटकर सिध्दार्थ क्रिष्णा | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.धरण विभाग, वाही/गोसीखुर्द धरण उपविभाग क्र. 4 वाही (रिक्तपदी) |
| 32 | 318 | जाधव निलेश विजय | वि.जा. | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.धरण विभाग, वाही/वसाहत व भांडार उपविभाग गोसीखुर्द (रिक्तपदी) |
| 33 | 326 | धनवडे अक्षय अरूण | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.धरण विभाग, वाही/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 9 वाही (रिक्तपदी) |
| 34 | 334 | बत्तुल यतीराज प्रसाद | वि.मा.प्र. | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.धरण विभाग, वाही/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 9 वाही (रिक्तपदी) |
| 35 | 406 | थाटे पियूष श्रावण | इ.मा.व | इ.मा.व. | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/मंडळ कार्यालयात (रिक्तपदी) |
| 36 | 415 | झाडे राकेश सूरेश | इ.मा.व | इ.मा.व. | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गो.पुर्नवसन विभाग, नागपूर/गोसीखुर्द पुर्नवसन उपविभाग क्र. 1 कुही (रिक्तपदी) |
| 37 | 471 | बावनकर सचिन शंकरराव | इ.मा.व | इ.मा.व. | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गोसीखुर्द उजवा कालवा विभाग ब्रम्हपूरी/गो.उ.का. उपविभाग क्र. 5 ब्रम्हपूरी |
| 38 | 559 | हरणे शूभम राजू | इ.मा.व | इ.मा.व. | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण विभाग, नागभिड/ आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण उपविभाग, क्र. 2 सावली (रिक्तपदी) |
| 39 | 648 | पवार ऐश्वर्या राजेंद्र | खूला | खूला | नागपूर | गो.प्र.मं.,नागपूर/गोसीखुर्द पुर्नसन विभाग, नागपूर/ गोसीखुर्द पुर्नवसन क्र. 1 कुही (रिक्तपदी) |

मुळ प्रत मा. मुख्य अभियंता यांना मान्य.

(स.ना.लढ्ढा)
सहायक मुख्य अभियंता,
गोसीखुर्द प्रकल्प,
जलसंपदा विभाग नागपूर

COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar DR. V.V. PATIL

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering,
Ahmednagar